Peer Reviewed International Research Journal of Geography
Maharashtra Bhugolshashtra Sanshodhan Patrika
ISSN : 0971-6785 {Impact Factor 4.567 Renew (IIFS)} Vol. 39, No.1, Jan-June 2022. pp 74-81

# Land Utilization of Bhandara City : Other Uses of Land
# भंडारा शहर भूमी उपयोजन : जमिनीचे अन्य उपयोग

Dr. Kailas U. Ishwarkar

## *Abstract*

*Buildings have been built for deferent activities and roads have create a shape of city. It's called Urban Morphology. At the time of development of city, deferent economic activities also formed in the city. Every activity has needed a place, as this location demand & according to deferent activities, buildings has been made on deferent location and according to activities city has divided in to deferent economic activity division. Bhandara city is district place, so this city provides near about all activities and services, like primary activities in surrounding area of city, secondary and tertiary activities in city area. Thus, the total area of city has been utilized for economic activities and houses and create many deferent activities zone in city and create a specific shape of city.*

**प्रास्ताविक :–**

नगरातील रस्ते व त्या दरम्यान वेगवेगळया कार्याकरिता निर्माण केलेल्या इमारती यावरून शहराला एक रूप प्राप्त होते. याला नगर आकारीकी (Urban Morphology)असे म्हणतात. नगर विकसीत होत असतांना तेथे वेळोवेळी कार्य निर्माण होतात. प्रत्येक कार्याला विशिष्ट स्थानाची गरज असते व त्यानुसार वेगवेगळया भागात विशिष्ट स्थानाच्या ठिकाणी कार्याला अनुरूप अशा इमारती तयार होऊन कार्यानुसार नगराचे वेगवेगळे विभाग निर्माण झालेले आढळतात. अनेक भूगोल तज्ञांनी विविध नगराचा अभ्यास करून या संदर्भात वेगवेगळे सिद्धांत मांडले आहेत.


**मागील अभ्यासाचा आढावा :-**

१९२५ मध्ये बर्जेस याने एक सिद्धांत मांडला जो एककेंद्री किंवा गोलाकार पट्टयाचा सिद्धांत म्हणून (Concentric or Zonal Theory) ओळखल्या जातो. यांच्या केंद्रस्थानी मध्यवर्ती व्यापारी विभाग म्हणजे C.B.D. विभाग असतो व त्याच्या भोवती वर्तुळाकार पट्टयाच्या स्वरूपात कार्यानुरूप वेगवेगळे भाग विकसीत होतात. पुढे १९३९ मध्ये हॉयट यांनी दुसरा सिद्धांत मांडला जो विभागीय सिद्धांत Sector theory म्हणून ओळखल्या जातो. या सिद्धांताप्रमाणे नगराच्या मध्यवर्ती व्यापारी विभागाभोवती गोलाकार स्वरूपात कार्याला अनुसरून पट्टे निर्माण न होता या मध्यवर्ती भागाच्या विशिष्ट भागात विशिष्ट कार्ये विकसीत होतात व तोच भाग नगर सिमेच्या दिशेने वाढत जातो. यापुढे १९४५ मध्ये हॅरिस Harriso व उलमन यांनी बहुकेंद्रिय सिद्धांत मांडला. या सिद्धांतानुसार अनेकदा एका मध्यवर्ती विभागाच्या सभोवती नगराचा विकास मर्यादित न राहता अनेकदा दुसरी केंद्रे निर्माण होतात व त्याभोवती नगराचा विकास होतो.


वरील सिद्धांतांचा विचार करून भंडारा नगरांच्या आकारिकीचे येथे विश्लेषण केले आहे. नगरातील रस्त्याबरोबरच नगरातील व नगर बाजूवरील नैसर्गिक घटकांचाही प्रभाव शहर आकारिकीवर झालेला आढळतो. म्हणूनच कार्यानुसार शहराचे विभाग निश्चित केल्यानंतर त्या भागाची कारणमिमांसा करतांना आर्थिक, सामाजिक, सांस्.तिक अशा घटकांबरोबरच नैसर्गिक घटकांचाही विचार केला आहे.

नगर हे एखाद्या परिपूर्ण जीवाप्रमाणे असते व त्याची सतत उत्क्रांती होत असते. या उत्क्रांतीच्या काळात त्या नगरातून म ार पूर्वी निर्माण झालेल्या कार्यात रूपांतरे होत असतात. तर कालानुरूप काही नविन कार्ये तेथे सुरू होतात.

**भंडारा षहराची भौगोलीक व सांस्कृतीक पार्ष्वभूमी :-**




भंडारा नगर




महाराष्ट्राच्या नागपूर विभागात भंडारा जिल्हयातील भंडारा हे ठिकाण जिल्हा केंद्र असून एक वाढत जाणारे नगर आहे. प्रदेषाच्या आर्थिक व सामाजिक जिवनांत हे नगर महत्वाचे कार्य करते. हे नगर $21^{0}10'$ उत्तर अक्षवुत्त व $७९^{0}40'$ ७९०४०श पूर्व रेखावृत्तावर वसलेले आहे. मुंबई कोलकाता राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वर वसलेले असून १२ कि.मी. अंतरावर भंडारा रोड या स्थानावरुन मुंबई कोलकाता रेल्वेमार्ग गेलेला आहे. भंडारा हे नगर मुंबई पासून पूर्वेला ९०० कि.मी. व नागपूर पासून पूर्वेला ६४ कि.मी. अंतरावर आहे

वैनगंगेच्या काठावर वसलेले हे शहर प्रत्यक्ष नदीपासून १ ते १.५ कि.मी अंतरावर आहे. उत्तर दक्षिण वाहणारी वैनगंगा नदी येथे वळण घेते. या वळणावर अंतर्वक्र भागात भंडारा शहराने अंतर्वक्र आकार प्राप्त केले आहे. भंडारा नगराची लोकसंख्या १९०१ मध्ये १४०२३ होती, स्वातंत्रोत्तर काळात ५० वर्षात १९५१ मध्ये २२६४० तर २००१ वर्षी ती ८५००१ वर पोचली. २०११ वर्शी भंडारा शहराची लोकसंख्याा आहे. भंडारा नगर १० प्रभागात विभागले असून पुढे ते ३२ वार्डात विभाजित केले आहे.

नगराच्या विकासात ब्रिटीश काळातील विकास व स्वातंत्र्योत्तर काळातील विकास यातील भिन्नता शहराच्या रुपिकीत स्पष्ट दिसते. शहर जसजसे मोठे होत गेले तससे कार्ये वाढत गेली व नगराला आकार मिळाला.

**परिकल्पना :**

नगराच्या मध्यभागात केंद्रीय कार्ये वाढल्यास केंद्रीय विभागासभोवलच्या भागात अन्य विभागांची निर्मीती होत असते..

**उद्येश :**

भंडारा शहरातील मध्यवर्ती व्यापारी विभागांच्या व्यतीरीक्त जमीनीच्या अन्य व्यापारी विभागांची निश्चिती करणे. हा सदर संशोधनाचा मुख्य उद्येश आहे.

**संशोधन पध्दती :**

प्राथमिक व व्दितीय स्तरावरील आकडेवारी एकत्रीत करुन आकडेमोड केल्यानंतर त्यांचे विश्लेषण केले आहे व योग्य त्या नकाशाशास्त्रीय पध्दतींचा उपयोग केला आहे सोबतच योग्य त्या ठिकाणी योग्य त्या सांख्यीकीय आकृत्यांचा उपयोग करुन आकडेवारीचे सादरीकरण केलेले आहे.

**भंडारा शहर भूमी उपयोजन :-**

उत्क्रांतीच्या काळात काही कार्ये मध्यवर्ती विभागातून नगराच्या बाहय विभागात जातात तर काही बाहय विभागातून मध्य विभागात येतात. काही कार्य की, जी प्रथम शहर मध्य विभागाजवळ असतात. ती नंतर मध्य भागात जातात व कालांन्तराने बाहय भागात जातात. या सर्व कार्याच्या स्थलांतर बदलामागे दोन शक्ती कारणीभूत असतात. कोलंबी (१९३३) याने अशा शक्तींना केंद्राकडे आकर्षित करणाऱ्या शक्ती म्हणजेच केंद्राकर्षक शक्ती व केंद्राकडून बाहेर लोटणाऱ्या शक्ती म्हणजे केंद्रोत्सारी शक्ती असे म्हटले आहे.

कार्यानुसार शहर आकारीकीचे वर्णन अनेक भूगोल तज्ञांनी केले आहे हे करित असतांना कार्याचे विभाजन साधारणपणे पुढील प्रकार करण्यात येतो. १) नगराचा वस्तीचा विभाग किंवा राहत्या घरांचा विभाग, २) औद्योगिक विभाग, ३) समाजउपयोगी उपयोगाची स्थळे, ४) शैक्षणिक विभाग, ५) वाहतूक व दळणवळण, ६) वित्तिय संस्थांचे विभाग, ७) शासकीय विभाग.


**सारणी : १**

| Sr.No. | Bhandara Land Use | Area in (Hec.) | % of total |
|---|---|---|---|
| 1 | Residential | 728.45 | 43.36 |
| 2 | Commercial | 8.39 | 0.49 |
| 3 | Industrial | 27.84 | 1.65 |
| 4 | Public & Semi Public | 85.63 | 5.09 |
| 5 | Western & Berren | 50.00 | 2.97 |
| 6 | Water Bodies | 93.92 | 5.38 |
| 7 | Public Utility | 33.07 | 1.96 |
| 8 | Transport & Communication | 113.87 | 6.77 |
| 9 | Agricultural | 538.48 | 32.13 |
| Total | | 1679.70 | 100% |

**१) भंडारा नगरातील राहत्या घरांचा विभाग :-**

पाश्चिमात्य शहरातून बहुदा राहत्या घरांचे विभाग आणि अन्य कार्याचे विभाग हे स्पष्टपणे वेगळे दिसतात. परंतु अलीकडील काही नियोजीत शहरे सोडल्यास (उदा. चंदीगढ) भारतात असे विभाजन आढळत नाही. रस्त्याच्या

बाजूने तळमजल्यावर व्यापारी कार्य, गृह उद्योग, अशी कार्ये चालू असतात व तेथेच वरच्या मजल्यावर अथवा पाठीमागे लोक राहत असतात. त्यामुळे कार्यानुसार वेगवेगळे विभाग स्पष्ट दाखविता येत नाही. असे असले तरी कार्यानुसार विभाग दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. भंडारा नगरातील राहत्या घरांचे विभाग पुढील नकाशात दर्शविले आहे.




नगरकेंद्र गांधी चौकापासून उत्तरेला दक्षिणेला व पूर्वेला राहत्या घरांचा जुना विभाग आहे. विभाग जुना असल्यामुळे येथे घरे व रस्ते यांचे नियोजन दिसत नाही. अशा जुन्या वस्तीचा भाग गांधी चौकापासून उत्तरेकडे विस्तारलेला आहे. त्याच्या तुलनेने गांधी चौकाच्या दक्षिणेस यांचा विस्तार पाच पटीने अधिक आढळतो.शहरांच्या दक्षिण भागात पूर्व पश्चिम दिशेने जाणाऱ्या नागपूर–रायपूर–राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ आहे. यांच्या दक्षिणेला सर्व शासकीय कार्यालय आहेत म्हणजे पूर्वी ब्रिटिशांनी मुख्य वस्तीपासून दूर अशा रितीने यांची योजना केली. परंतु अलीकडच्या ५०–६० वर्षात हा मधला भाग राहती घरे व अन्य कार्यांनी व्यापला आहे व आज उत्तर दक्षिण विस्तारलेला असा राहत्या घरांचा भाग दिसतो.

या मध्यवर्ती राहत्या घरांचा विस्तार अन्य दिशेने काही कारणामुळे मर्यादित झाला आहे. पश्चिम दिशेने खांब तलाव व जिल्हा कारागृह असल्याने या दिशेने विस्तार रोखला गेला. उत्तरेला लाल बहादूर शाळा, कन्या काळा, कब्रस्थान व पूर्व दिशेने मेंढा तलावामुळे विस्तारावर मर्यादा पडली आहे. या अशा अडथळयांच्या दरम्यान राहत्या घरांचा भाग सुळक्याप्रमाणे पुढे घुसलेला आहे. आग्नेय दिशेला सागर तलाव व नविन दवाखाना तर नैऋत्य दिशेला मिसकील तलाव यामुळे विस्ताराला मर्यादा पडल्या आहेत.



यांच्या पलीकडे राहत्या घरांचा विभाग उत्तर व पश्चिम भागात शहर सिमेपर्यंत विस्तारलेला आहे. पश्चिमेकडे जी उत्तर–दक्षिण रेल्वे लाईन जाते त्या पलिकडे राहत्या घरांच्या वेगवेगळया वसाहती निर्माण झालेल्या आढळतात. तुलनात्मकदृष्टया जमिनीचे मुल्य कमी असल्यामुळे घरांनी मोठया जागा व्यापल्या आहेत. तसेच या भागातून रस्त्याची सुविधा, पाणी वाहून जाण्याची व्यवस्था व पिण्याच्या पाण्याची सोय असल्यामुळे या भागाकडे मध्य व उच्च वर्गिय लोक आकर्षित झालेले आढळतात.

केंद्रापासून पूर्वेकडे सलग वस्तीचा विकास एका मर्यादीत अंतरापर्यंत झालेला आहे. पलीकडे असलेल्या वैनगंगा नदीचा पुराचा धोका असलेला हा भाग आहे. या नदीमुळे सांडपाण्याची व्यवस्था चांगली नसल्याने वातावरण आरोग्याला पोषक नाही. या कारणामुळे या भागात विविध झोपडपट्टया आढळतात व तेथे आर्थिकदृष्टया कनिष्ठ वर्गातील लोक आढळतात.

नगरात आर्थिकदृष्टया मध्यम व कनिष्ठ वर्गातील लोक मोठया प्रमाणात आढळतात. नगराचा जो मध्यवर्ती व्यापारी विभाग आहे. त्याच्यासभोवती प्रामुख्याने अल्प उत्पन्न गटातील लोक राहतात. या भागात अनेक झोपडपट्टया आहेत. साधारण तलावाच्या बाजूने राहणे गैरसोयीचे आहे असा हा विभाग आहे. बर्जेस याने सांगीतल्याप्रमाणे मध्यवर्ती व्यापारी विभागाला लागून पडक्या घरांचा विभाग तयार होतो. परंतु या नगरातील हा भाग वर्तूळाकार नसून तुटक असा दिसतो.

नगरात आर्थिकदृष्टया उच्च वर्गात मोडणाऱ्या नागरीकांची संख्या फार थोडी आहे. असे लोक नगर

मध्यातील गर्दी टाळण्यासाठी मध्यापासून दुर घरे बांधतात अशा लोकांची घरे बहुदा प्रशस्त असल्याने दूरवर जाणे यांना आवश्यक वाटते. असे चार लहान विभाग नगराच्या उत्तर भागात तर तीन लहान विभाग नगराच्या नैऋत्य भागात आढळतात. उत्तर भागातील काही अन्य वर्गीय लोक काही वर्षापूर्वी पितळी भांडयांच्या व्यवसायात असल्याने श्रीमंत झाले आहे.

**२) नगरातील औद्योगिक क्षेत्र :-**



भंडारा नगरातील असे औद्योगीक विभाग नकाशात दर्शविले आहे. या नगरात काही दशकापूर्वी पितळी भांडे तयार करण्याचा उद्योग अतिशय महत्वाचा होता व येथील उत्पादन महाराष्ट्राप्रमाणे इतर राज्यातही जात होता. परंतु स्टेनलेस स्टीलचा उपयोग वाढल्यावर या मालाची मागणी झपाटयाने घटली व येथील पितळी भांडयाचे कारखाने बंद पडले. नगराच्या उत्तर भागात तुमसर रस्त्याच्या बाजूने टाकळी गावाच्या आसपास अनेक कारखाने होते. यापैकी बहुतेक कारखाने आज बंद झालेले असून त्यातून उत्पादन होत नाही. परंतु याच ठिकाणी लाकूड कापण्याच्या गिरण्या (Saw Mills) आढळतात व केवळ त्याचे स्थानिक महत्व आहे.

दुसरा औद्योगिक विभाग शहरापासून दूर नागपूरला जाणाऱ्या रस्त्याच्या बाजुने औद्योगिक क्षेत्र असून शासनाच्या सहकार्याने येथे काही आधुनिक उद्योग तयार झालेले आहे. पूर्वी या भागात देखील पितळी उद्योग महत्वाचा होता व विस्तृत जागेत होता अशा मोठया जागांचा लाकूड कटाई करिता उपयोग होत असल्याने हा उद्योग या जागेवर कार्यरत आहे.

**३) समाजपयोगी स्थळे :-**

या नगरात प्रामुख्याने क्रिडांगणे, बगीचे, मंदीरे, मशिद, चर्च यासारखे प्रार्थना स्थळे, कब्रस्थान व स्मशाने यासारखी अंतीम संस्काराची स्थाने समाविष्ट केली आहेत व ही सर्व नकाशावर प्रदर्शित केली आहेत.

क्रिडांगणे ही मुले व तरूणांच्या दृष्टिने आवश्यक असतात. यामुळे एकतर खेळावयाची सोय होते, दुसरे म्हणजे दाट वस्तीच्या भागात मोकळया जागा निर्माण होतात की ज्या पर्यावरणाच्या दृष्टिने महत्वाच्या असतात. संपूर्ण भंडारा नगरांचा विचार केला तर बहुतांशी क्रिडांगणे शाळा किंवा महाविद्यालयाच्या मालकीची आहेत. नकाशाचे अवलोकन केल्यास दक्षिण मध्य भागात क्रिडांगणाचे केंद्रीकरण झालेले आढळते. तर काही थोडी क्रिडांगणे नगरांच्या मध्यवर्ती व्यापारी केंद्राच्या उत्तर सिमेजवळ आढळतात. परंतु ही देखील शैक्षणिक संस्थेची आहेत.



क्रिडांगणांप्रमाणे नगरात स्वच्छ हवा ठेवण्याच्या दृष्टीने व मनोरंजनाच्या दृष्टीने बगीचे आवश्यक असतात. परंतु या नगरातील बगीच्याच्या वितरणाचे स्वरूप पाहता ते देखील केंद्रीत स्वरूपाचे दिसते. असे बहुसंख्य बगीचे मध्यभागातील व्यापारी विभागाच्या पश्चिमेस किंवा वायव्य भागात आढळतात.

इतर आवश्यकतेप्रमाणे प्रार्थना स्थळे ही देखील एक सामाजिक आवश्यकता असते. नगराच्या मध्यवर्ती भागाच्या सिमेवर दक्षिण व आग्नेय दिशेने अनेक मंदिरे आढळतात. इतरत्र साधारण रस्त्याच्या बाजूने परंतु दाट

वस्तीच्या भागाजवळ मंदीरे आढळतात. नगरांच्या साधारण पश्चिम मध्य भागात बायपासच्या बाजूने शहरातील एकमेव कॅथॉलीक चर्च आहे. मुसलमान समाजाच्या दृष्टिने नगरात मशिदी आढळतात. नगराच्या दाट वस्तीच्या भागात तीन मशिदी आहेत. या व्यतिरिक्त शहर सिमेजवळ सिव्हील लाईन जवळ एक मोठी मशिद असल्याचे आढळते.

शारिरीक स्वास्थाच्या दृष्टिने शहरात अनेक मोठे दवाखाने कार्यरत आहेत. शहराच्या मध्य वस्तीत अनेक डॉक्टर व त्याचे दवाखाने आणि खाटांची सोय आणि आधुनिक उपकरणाद्वारे उपचार करण्यासाठी बरेच दवाखाने निर्माण झाले आहे.

नगरवासीयाकरिता अंतीम संस्कार करण्यासाठी धर्माला अनुसरून तीन ठिकाणी सोय केलेली आहे. उत्तर–मध्य भागात तुमसर रोडच्या बाजूने मुसलमानाचे कब्रस्थान तर पश्चिम मध्यभागात असलेल्या चर्चच्या बाजूने खि्राश्चन लोकांची दम नभूमी आहे. नगराच्या दक्षिणेला वैनगंगेच्या उजव्या बाजूवर घाट बांधून जवळच हिंदुची दहनभूमी तयार केली आहे. अशा रितीने तीन धर्माच्या या सोयी नगर मध्यांच्या तीन दिशेवर आढळतात.

या व्यतिरिक्त सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टिने वाचनालय महत्वाचे असते. असेच एक वाचनालय शहर मध्यातील गांधी चौकाजवळ मन्रो हायस्कूल जवळ आढळते. नगराच्या दक्षिण भागात एका विस्तारित जागेत पत्रकार कार्यालय आहे.

**४) नगरातील शैक्षणिक संस्था :-**

भंडारा नगर शैक्षणिक दृष्टया बरेच पुढारलेले आहे. केवळ नगरातील शिक्षण संस्था नगरातील विद्यार्थ्याकरिता नव्हे तर काही प्रमाणात नगराबाहेरील विद्यार्थ्याकरिताही कार्य करतात. पुढील नकाशात. भंडारा नगरातील वेगवेगळया शैक्षणिक संस्थांचे स्थान दर्शविले आहे.

नकाशावरून स्पष्ट दिसते की, नगर मध्यापासून दक्षिणेकडे व उत्तरेकडे प्रमुख रस्त्याच्या बाजूने या संस्था स्थापन झाल्या आहेत. दक्षिण भागात कलेक्टर ऑमि स चौकापासून मुस्लीम लायब्ररीपर्यंत जो रस्ता जातो या रस्त्याच्या डाव्या बाजुवर एका विस्तारीत भागात शाळा कॉलेज आहे. या भागात गांधी हायस्कूल,जेसीस कॉन्व्हेंट, त्याच्या बाजूला जे.एम. महाविद्यालय व आर.एम. पटेल महाविद्यालय आढळते. याच दक्षिण भागात नागपूर रोडच्या बाजूने प्रगती महाविद्यालय कार्यरत आहे. मुस्लीम लायब्ररी चौकाच्या ईशान्य कोपऱ्यात गांधी शाळा आढळते.



शहराच्या मध्यवर्ती भागापासून उत्तरेकडे तुमसरच्या दिशेने जे रस्ते जातात त्याच्या बाजूने काही शाळा आहेत. मन्रो चौकाकडून जो उत्तरेला रस्ता जातो. त्याच्या डाव्या बाजूला लालबहादूर विद्यालय स्थापन झाले आहे. याच दिशेने पुढे डी.एड. कॉलेज, बी.एड. कॉलेज आहे व पुढे बरेच अंतर सोडून शहर सिमेजवळ औद्योगिक प्रशिक्षण व समाजकार्य महाविद्यालय स्थापन झाले आहे. या व्यतिरिक्त अन्य भागातही काही शाळा आढळतात. हेडगेवार चौकाजवळ नूतन मुलींची शाळा आहे. हे वितरण पाहता असे आढळते की, बहुतेक शाळा व महाविद्यालये मध्यवर्ती व्यापारी केंद्राच्या सभोवती स्थापन झाली आहेत. या व्यापारी केंद्राच्या वशेषत: उत्तर व दक्षिण भागात यांचे प्रमाण अधिक आहे.

**५) वाहतूक व दळणवळणाच्या कार्याची स्थळे :-**

नगर विकासाच्या दृष्टिने ही कार्ये महत्वाची असतात. नकाशात या कार्याची स्थळे दाखविली आहेत. नकाशाचे अवलोकन केले असता असे आढळते की या सर्व कार्याचे आग्नेय म्हणजेच दक्षिण पूर्व भागात नगर मध्य वर्तुळात केंद्रीकरण झाले आहेत. याचठिकाणी राष्ट्रीय महामार्गाकडे येणाऱ्या रस्त्यावर मुख्य बसस्थानक आहे. येथून बाहेर गावी जाणाऱ्या बसेस जा–ये करतात. याच्याच बाजूला पूर्वेकडे बस डेपो आहे. नगराच्या एका बाजूला या सोयी असल्यामुळे बाकी शहरवासीयांना थोडे गैरसोयीचे होते.

याच भागात दळणवळणाच्या सोयी आहेत. गांधी चौक ते राष्ट्रीय हमरस्त्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर मुख्य टपाल व तार कार्यालय असून यापासून जवळच दक्षिणेला दूरध्वनी केंद्र आहे. एकंदरीत संपूर्ण शहराचा विचार केला तर वाहतूक व दळणवळणाचे सोयीचे हे वितरण केंद्रीत स्वरूपाचे दिसते.

अशा प्रकारची गैरसोय थोडी म ार कमी करण्यासाठी शहर मध्याजवळ एक व उत्तरेला प्रमुख चौकाजवळ एक असे दोन बसथांबे  निर्माण केले आहे. बाहेर गावावरून येणाऱ्या बसेस मधून येणारे प्रवासी येथे उतरतात अथवा चढू शकतात. या व्यतिरिक्त मालाची वाहतूक करणाऱ्या ट्रकसाठी म्हणजेच माल भरणे व उतरविण्यासाठी व्यवस्था जिल्हा कारागृहाच्या आग्नेय दिशेला केलेली आहे. शहराच्या मध्यवर्ती व्यापारी विभागाच्या दृष्टिने हा विभाग तयार केलेला आहे.

**६) वित्तीय संस्थांचे वितरण :-**

गटात वेगवेगळया राष्ट्रीय.त व सहकारी बँका व आयुर्विमा कार्यालयाचा समावेश केला आहे. यांचे स्थान नकाशावर दर्शविले आहे.



दक्षिण भागात पूर्व–पश्चिम दिशेत जो राष्ट्रीय हमरस्ता जातो त्याच्या दक्षिणेला आर्युमंडळ आहे. याच रस्त्याच्या बाजूने जिल्हा परिषद जवळ नागरी सहकारी बँक आढळते. अशाप्रकारे हे वितरण व्यापारी किंवा शासकीय कार्यालय व प्रमुख रस्ते यामुळे प्रभावित झाले आहे.

**७) शासकीय व निमशासकीय विभाग :-**

नकाशावरून स्पष्ट दिसते की, अशा सर्व कार्यालयाचे केंद्रीकरण नगराच्या दक्षिण भागात राष्ट्रीय हमरस्त्याच्या बाजूने झालेले आहे. विशेषत: नगराच्या मध्य भागाकडून येणारा तुमसर रोड ज्या ठिकाणी राष्ट्रीय हम रस्त्याला मिळतो त्याच्या सभोवती अशा कार्यालयाचे केंद्रीकरण झाले आहे. याच ठिकाणी राष्ट्रीय हम रस्त्याच्या दक्षिणेकडे जिल्हाधिकारी व पोलीस अधिकारी कार्यालय आहे.

यांच्या पश्चिम बाजला चर्च असून त्याच्या दक्षिणेस पोलीसांची निवास व्यवस्था आहे. यापलीकडे पश्चिमेस न्यायालयाची इमारत त्याचबरोबर जिल्हा परिषदेची इमारत आहे. याच्यापुढे पश्चिमेस जवाहरनगरला जाणाऱ्या रेल्वे मार्गाच्या पुढे राज्य परिवहन व महाराष्ट्र विद्युत कंपनीचे कार्यालय आहे.



तुमसर रोड राष्ट्रीय हमरस्त्याला जेथे मिळतो. त्याच्याच ईशान्येला तहसील कार्यालय पंचायत समिती कार्यालय, जंगल विभागाचे कार्यालय अशी शासकीय कार्यालये आढळतात. यांच्याच पूर्वेला काही अंतरावर

**बायपासच्या बाजूला बांधकाम विभागाचे कार्यालय आहे. या व्यतिरिक्त लहान शासकीय कार्यालये अथवा निमशासकीय कार्यालये याच भागात कार्यरत आढळतात. एकंदरीत या शासकीय व निमशासकीय कार्यालयाचा विभाग नगराच्या दक्षिण भागात आढळतो.**

**निष्कर्श :–**

**मध्यवर्ती व्यापारी विभागाच्या व्यतीरीक्त नगरात अन्य काही चौकात व रस्त्यांच्या बाजुने व्यापारी कार्ये चालतात. उत्तरेकडे तुमसर मार्गाने, पश्चिमेकडे खांब तलाव रस्त्याच्या बाजुने तर दक्षिणेस राष्ट्रिय महामार्गाच्या दिशेने जे रस्ते जातात त्यांच्या बाजुने दुकानांच्या रांगा असून तेथे व्यापारी कार्ये चालतात. परंतु पूर्वेकडे  कमी उत्पन्न गटातील लोक राहात असल्याने व्यापारी कार्ये महत्वाचे नाही.**

**नगरात वेगवेगळया भागात वेगवगळया कार्यानुसार वेगवेगळे विभाग तयार होतात. परंतु भारतातील नगरातुन राहती घरे व व्यापारी विभाग सोबतच आढळतात. मध्यवर्ती भागात राहती घरे एकमेकांना लागून आहेत, षहराच्या पश्चिम भागात मोकळी व स्वतंत्र घरे आहेत.पूर्व भाग शारीरीक श्रम करणाऱ्या मजूर लोकांचा आहे त्यामुळे हा भाग झोपडपट्टीयुक्त आहे. दक्षिणेकडे राहत्या घरांचा विभाग कमी आहे.**

**नगराच्या दक्षिण व पूर्व भागात क्रिडांगणे, बगिचे, व अन्य सामाजिक उपयोगाची स्थळे आढळतात. महामार्गाच्या बाजुने विविध शासकीय विभाग असून, जिल्हा मुख्यालय, न्यायालय, जिल्हा परिषद कार्यालय तर दुसऱ्या बाजुला रेस्टहाउस, जिल्हा वन विभाग कार्यालय, महाविद्यालये, बस व गाडया स्थानक, इ. कार्ये चालतात. दक्षिण–पूर्व भागात बस डेपो, जिल्हा रुग्नालय, जनावरांचे बाजार व भाजीपाल्याचे ठोक व्यापारी केंद्र तयार झाले आहे. याव्यतीरीक्त नगराच्या उत्तर भागात अनेक षाळा, तंत्रनिकेतन केंद्र व कारखाने तयार झालेली आहेत.**

**संदर्भसुची**

1 Burgess, E.W. : "The Growth of the City", University of Chicago Press, 1925, p. 47-62.
2 Colby, C.C.. : "Centrifugal and Centripetal Forces in Urban Geography", AAAG, Vol. XXIII, 1933.
3 Harris, C.D. : "A functional Classification of Cities in the United Stated", Geog. Rev., VOI, XXXIII, 1943.
4 Hoyet, H. : "The Structure and Growth of Residential Neighbourhoods in American Cities", Washington, 1939.
5 D S Ghungarde & J C More (2021) Impact Analysis of 'Jalyukta Shivar' Scheme, A Case Study of Chas Village in Ahmednagar District. Vol, 8, Issue, 29, PP, 1-5, UGC Care Listed
6 D S Ghungarde & J C More (2021), Environment Analysis of Climate Elements of Ahmednagar District. Akshar Wagnmay, UGC Care Listed, Special Issue Vol, 5, PP, 103-107
7 D S Ghungarde & J C More (2021), A Geographical Study of Rainfall Study Distribution in Ahmednagar District. International Journal of Researches in Biosciences, Agriculture & Technology, IJRBAT, Special Issue 15, PP, 108-112. Open Access Journal.

*** Dr. Kailas U. Ishwarkar**
Smt. Rewabem Manoharbhai Patel
Mahila Mahavidyalaya, Bhandara